# हरित क्षेत्रे व वन विभाग

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करणेत येते त्यामध्ये शहरातील व्यक्ती, संस्था, मंडळ, शाळा, कारखानदार इत्यादींचा मोठ्या प्रमाणावर सहभाग असतो.

## *वृक्षारोपण उद्दिष्ट सन २००७ - २००८ :-*

सन २००७ - २००८ मध्ये महापालिकेने एकूण ५०,५३६ वृक्षारोपण करण्याचे उद्दिष्ट ठेवलेले असुन ते थोडक्यात खालीलप्रमाणे

अ) मनपा मार्फत

ब) व्यक्ती, संस्था, कारखानदार, मंडळ यांना रोपवाटिकेतुन विक्री व वाटप

क) दिघी ते आळंदी मार्ग (मिलिटरी हद्दीमध्ये)

आपले शहर हरित व सुंदर दिसावे यासाठी महानगरपालिका प्रयत्न करीत आहे. परंतु वृक्षारोपण व संवर्धन करणे हे एकट्या महापालिकेचेच काम नाही. वृक्षारोपण व संवर्धन यामध्ये शहरातील नागरिक व विविध संस्थांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर असणे आवश्यक आहे. शहर सुशोभिकरणाअंतर्गत शहरातील रस्त्याच्या दुभाजकामध्ये वृक्षारोपण करून रस्ते सुशोभित करणेचे नियोजन असुन पहिल्या टप्प्यामध्ये खालील प्रमुख पाच रस्त्याचे सुशोभिकरण करणेत आलेले आहे. मनपा, प्राधिकरण, एम.आय.डी.सी. च्या मोकळ्या जागा, रस्त्याच्या कडेने, नाल्याच्या /नदीच्या कडेने, मनपा / खाजगी शाळा, हॉस्पिटल, स्मशानभुमी / दफनभुमी, उद्याने, पाण्याच्या टाक्या व पंपींग स्टेशन इत्यादी ठिकाणी मनपा मार्फत मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करणेत आलेले आहे.

**१९९२ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थापनेनंतर दरवर्षी केलेल्या वृक्षारोपणाचा तपशिल खालीलप्रमाणे**

| सन | म.न.पा. मार्फत वृक्षारोपण | व्यक्ती, संस्था यांना सवलतीचे दरात वाटप व विक्री | एकुण |
|---|---|---|---|
| १९८२ - ८३ | ३५,८२७ | १८,८२१ | ५४,६४८ |
| १९८३ -८४ | २,३५,९४८ | ३५,५५८ | २,७१,५४२ |

| | | | |
|---|---|---|---|
| १९८४ - ८५ | १,७६,३१५ | २७,३६० | २,०३,३७५ |
| १९८५ -८६ | ४६,७७५ | ४४,९६६ | ९१,७४१ |
| १९८६ -८७ | २०,७६९ | ६१,४३२ | ८२,२०१ |
| १९८७ - ८८ | १९,५६८ | १५,०२१ | ३४,५८९ |
| १९८८ - ८९ | १,३४,५७७ | ४३,६८५ | १,७८,२६२ |
| १९८९ - ९० | १,४९,२१० | ५०,८८८ | २,००,०९८ |
| १९९० - ९१ | १,८५,७०८ | ८१,६५१ | २,६७,४५९ |
| १९९१ - ९२ | २,१४,०९८ | ५२,४५८ | २,६६,५५६ |
| १९९२ - ९३ | १,९५,४०७ | ६१,९०४ | २,५७,३११ |
| १९९३ - ९४ | ७५,२३७ | २६,४९९ | १,०१,७३६ |
| १९९४ - ९५ | ५३,१३९ | २६,८६४ | ७९,९०३ |
| १९९५ - ९६ | १,२१,७८२ | २७,१०९ | १,४८,८९१ |
| १९९६ - ९७ | ७९,२५४ | ४७,५८३ | १,२६,८३७ |
| १९९७ - ९८ | ६१,६८८ | ३०,६७९ | ९२,३६७ |
| १९९८ - ९९ | ७९,३४४ | २६,६७९ | १,०६,०२३ |
| १९९९ - २००० | २७,२०६ | ५३,५४० | ८०,७४६ |
| २००० - ०१ | २५,८४९ | २३,०७७ | ४८,९२६ |
| २००१ - ०२ | १८,२६३ | २४,२९१ | ४२,५५४ |
| २००२ - ०३ | १६,६८९ | ११,७५३ | २८,४४२ |
| २००३ -०४ | २१,०३२ | १९,४०७ | ४०,४३९ |
| २००४ -०५ | ४०,१६९ | १२,०९४ | ५१,८५३ |
| २००५ - ०६ | ३१,८३३ | २०,०३० | ५१,८६३ |
| २००६-२००७ | ३५,१०५ | ७,०९९ | ४२,२०४ |
| २००७-२००८ | ४१५५६ | ७,९२२ | ४९,४७८ |
| **एकूण** | २१,४२,३४८ | ८,५८,३७० | ३०,००,०४४ |

## -: नागरी वनीकरण बृहत आराखडा:-

भारतीय राज्य घटनेच्या ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार महाराष्ट्र शासनाने नैसर्गिक स्त्रोतांच्या जपणुकीसाठी तसेच वाढीसाठी कायद्यात दुरुस्ती केली आहे व त्यामध्ये त्यांनी प्रत्येक शहरात (मनपात) वनीकरण करणे बंधनकारक केले आहे.

पिंपरी - चिंचवड शहर हे जगाच्या नकाशावर औद्योगिक शहर म्हणुन नावारूपाला आलेले आहे. शहराचे क्षेत्र १७०.५६ कि.मी. असुन सन २००१ सालच्या जनगणनेनुसार लोकसंख्या १००६६२२ पेक्षा जास्त आहे. तसेच शहरामध्ये लहान मोठे ५५२५ कारखाने आहेत. शहराची औद्योगिक दृष्ट्या वाढ होत असताना पर्यावरणाचा ऱ्हास होवू नये, समतोल राखला जावा व पिंपरी चिंचवड शहर हे हरीत पिंपरी चिंचवड शहर म्हणून नावारूपाला यावे यासाठी म.न.पा. हद्दीत मोठ्या प्रमाणावर वनीकरण होणे गरजेचे आहे. तसेच शासनाने घटनेत केलेल्या दुरुस्तीच्या अंमलबजावणीसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने नागरी वनीकरण बृहत आराखडा तयार करणेसाठी मोकळी जागा, रस्ते, टेकड्या, नदी - नाले, शाळा, रुग्णालये, स्मशानभुमी, निवास क्षेत्र ठिकाणांचे वॉर्डनिहाय सर्वेक्षण केले आहे. शहरातील भौगोलिक, औद्योगिक परिस्थितीचा, जमीनीचा, हवामानाचा व होणाऱ्या प्रदुषणाचा विचार करुन कोणत्या ठिकाणी प्रजातींची झाडे लावणेत येतील, त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.क्र | ठिकाण | लहान झाडे (झुडपे) | मोठी झाडे |
|---|---|---|---|
| १ | रस्त्याच्या कडेने | जास्वंद, कण्हेर, हेमेलिया, पेंटस, सदाफुली इत्यादी | नीम, कांचन, पिंपळ, वड, चिंच, गुलमोहोर, पेल्टाफोरम, जॅकरांडा, भेंडी, बहावा, आकाशनिम इत्यादी |
| २ | नाले व नदीच्याकडेने | निरगुडी, थंबरजीवा, वालंग इ. | कांचन, आपटा, उंबर, बांबु, शिसम, चिंच, आंबा,बाभूळ, कळंब,सुरु,पाम,करंज,बोरइ इ. |
| ३ | हॉस्पिटल क्षेत्र | अडुळसा, जास्वंद, मेंदी इ. | चिंच, आंबा, गुलमोहोर, पेल्टाफोरम, नीम, स्पॅथेडिया, गुलमेंदी, करंज, लिंबारा, आकाशनिम इ. |
| ४ | शैक्षणिक जागा | अडुळसा, शंकेश्वर, जास्वंद, हेमेलिया, पेंटस इ. | स्पॅथेडिया, जॅकरांडा, कॅशिया, फायकस, बेंजामिन, चिंच, आंबा, पेरु, बॉटलब्रश, कांचन, लिंबारा, अशोक इ. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | व्यापारी व सार्वजनिक जागा | अडुळसा, जास्वंद, शेर, मेंदी, सर्पगंधा इ. | भहावा, निम, कांचन, लिंबारा, करंज, सीताफळ, अशोक, पाम, बांबु, स्पॅथाडिआ, जॅकराडा, पळस इ. |
| ६ | उद्याने व उपवने | अडुळसा, हेमेलिया, पेंटस, जास्वंद, कोटान, गुलाब, फर्न, केक्टस इ. | आकाशनिम, स्पॅथोडिया, अशोक, कदंब, जॅकरांडा,अशोक,खिसमस, बॉटलब्रश,पाम इ. |
| ७ | औद्योगिक क्षेत्रे | अडुळसा, जास्वंद, शेर हेमेलिया, पेंटस, इ. | शिसम, सुरु, बहावा, खैर, पळस, लिंबारा, करंज, जांभुळ, निम, बाभूळ, फायकस इ. |
| ८ | निवासी क्षेत्रे | शंकेश्वर, जास्वंद, मेंदी, सदाफुली, हेमेलिया, पेंटस इ. | आंबा, पेरु, आवळा, पाम, नारळ, बहावा, कांचन, आकाशनिम, निम इ. |

वरील नागरी वनीकरण बृहत आराखडयात ठरविल्यानुसार मनपामार्फत वरीलप्रमाणे वृक्ष लावण्यात आले.

## *-: नागरी वनीकरण नियोजनाचे महत्वाचे उद्देश :-*

१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील विविध देशी, स्थानिक झाडांची माहिती घेणे व यादी तयार करणे.

२) देशी, स्थानिक झाडांची माहीती असलेली व प्रत्यक्ष ज्ञात झालेली मुल्ये यांची नोंद घेणे.

३) नागरी वनीकरणावर शहरातील निरनिराळ्या पर्यावरण विषयक बाबींचा होणारा विपरीत परीणाम टाळणे.

४) शहरातील देशी, स्थानिक झाडांची नानाविधता व पर्यावरण विषयक महत्व जाणून घेणे.

५) नागरी वनीकरणाच्या अनुषंगाने तांत्रिक सहाय्य व सांस्कृतिक माहीती पुरविणे.

६) नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुर्नवापर करणे व शहरातील पर्यावरण विषयक प्रदुषण कमी करणे.

७) नैसर्गिक जमिनीचा अथवा हिरव्या पट्ट्याचा ऱ्हास कमी करणे.

## *म.न.पा.ने ठरविलेल्या वृक्षारोपण उद्दिष्ठांची माहिती दर्शविणारा तक्ता -*

| अ.क्र. | वर्षे | मनपामार्फत करावयाचे | रोपवाटिकेतून विक्री + वाटप | एकूण उद्दिष्ट |
|---|---|---|---|---|
| १ | २००१ - २००२ | ८७०१ | ११३०० | २०००१ |
| २ | २००२ - २००३ | ७९६६ | ११३८५ | १९३५१ |
| ३ | २००३ - २००४ | १८४३९ | ५६१८ | २४०५७ |
| ४ | २००४ - २००५ | १८४३८ | ५६१८ | २४०५६ |
| ५ | २००५ - २००६ | २०३३२ | १९३३८ | ३९६७० |
| ६ | २००५ - २००६ | २०३३२ | १९३३८ | ३९६७० |
| ७ | २००६-२००७ | ९२६०५ | ७३९५ | १००००० |
| ८ | २००७-२००८ | ५०५३६ | ८५३८ | ५९०७४ |
| | **एकूण** | २३७३४९ | ८८५३० | ३२५८७९ |

## *म.न.पा.ने ठरविलेले वृक्षारोपण उद्दिष्ठ व पुर्ण केलेले उद्दिष्ठांची माहिती दर्शविणारा तक्ता*

| अ.क्र | सन | वृक्षारोपण उद्दिष्ट | झालेले वृक्षारोपण | जिवंत वृक्षारोपण | जिवंत वृक्षारोपणाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २००१ - २००२ | २२६३५ | १८२६३ | १५१६४ | ८३.०३ |
| २ | २००२ - २००३ | १२४६७ | १६६८९ | १४६२५ | ८७.६३ |
| ३ | २००३ - २००४ | २५२४५ | २१०३२ | १५६८५ | ७४.५७ |
| ४ | २००४ - २००५ | १२४५६ | ४०१६९ | ३०९३५ | ७७.०८ |
| ५ | २००५ - २००६ | ३०३३२ | ३१८३३ | २५३२४ | ७९.५५ |
| ६ | २००६-२००७ | ९२६०५ | ३११०५ | २२७२४ | ६४.७३ |
| ७ | २००७-२००८ | ५०५३६ | ४१५५६ | + | + |
| | **एकूण** | २४६२७६ | २००६४७ | १२४४५७ | --- |

\+ जिवंत वृक्षारोपणाची संख्या मोजणीचे काम चालु आहे.

## -:वृक्षारोपण :-

शहराचे वाढते स्वरूप व पर्यावरण संतुलनाचा विचार करून महापालिकेने शहारामध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केलेले आहे. यामध्ये सन १९९८ पासुन आमुलाग्र बदल करून नव्याने समाविष्ठ झालेल्या गावातील गायरान तसेच इतर ठिकाणी २८०.८५ हेक्टर क्षेत्रावर १,२६,२९४ इतके वृक्षारोपण करणेत आलेले आहे. त्यामुळे सदरच्या जागा अतिक्रमणापासुन मुख्यत्वे झोपडपट्टी होण्यापासून वाचलेल्या आहेत. हे वृक्षारोपण हे मुख्यत्वे तळवडे, चिखली, मोशी, दिघी इ. गावातील गायरानावर तसेच रेल्वे लाईन कडेने, नदीच्या कडेने व एम.आय.डी.सी. कडील मोकळ्या जागांवर केलेले आहे. या वृक्षारोपणाचे वैशिष्ट्य म्हणजे ४ ते ६ फुट उंचीच्या रोपांची लागवड करणेत आलेली असुन यामध्ये वड, पिंपळ, चिंच, भेंडी, निम, साग, पेल्टाफोरम, कॅशियास्पेसिज, शिरस, करंज, बोर, जांभुळ, सिताफळ, आंबा इ. दिर्घायुषी रोपांचा समावेश आहे.

### सन १९९८ पासुन वृक्षारोपण केलेल्या ठिकाणांचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र. | वृक्षारोपण ठिकाण | क्षेत्र (हे.) | वृक्षसंख्या | मुख्यत्वे प्रजाती |
|---|---|---|---|---|
| १ | तळवडे गट नं. १ ब | ३६.०० | २५२७५ | सन १९९७ पासून मुख्यत्वे |
| २ | चिखली स.न.१६५३/ १६५४ | १५.६१ | ९२०० | वड १२९७ |
| ३ | मोशी स.न. ६४१ / ६४६ | ८०.०० | २२४३२ | पिंपळ २७४७ |
| ४ | मोशी गट क्र. ३१८ | १०.०० | ७८६० | चिंच ६१८९ |
| ५ | दिघी स.न. ७७ | १४.२५ | ७६१९ | भेंडी २०३५ |
| ६ | से.न. २६ तळे | १०.०० | ६४५० | आंबा ७०१ |
| ७ | आकुर्डी चिंचवड रेल्वेलाईन | १.२० | ५२६० | सिताफळ २४४४ |
| ८ | पवना नदीच्या कडेने | २०.०० | ३२७० | जांभूळ ३२०२ |
| ९ | दुर्गादेवी उद्यान | ३०.०० | ७३४० | निम ३२७९ |
| १० | एम.आय.डी.सी. कडील २७ मोकळ्या जागा | ३८.२४ | १२१४५ | साग २५२७ |
| ११ | स.न. १३१ भोसरी | ७.१३ | ७५०० | पेल्टोफोरम ३९३५ |
| १२ | कासारवाडी मलशुध्दीकरण | ६.०० | ५८६० | याशिवाय कॅशिया, स्पेसिज, शिरस, करंज, बंहडा, आवळा, रिठा, बांबू, फणस, बोर, गुलमोहोर, सिल्वर, ओक, अर्जुन, महागमी, कांचन, रेनट्री, बादम, जारूळ, शिसू, इ. प्रजाती लावलेल्या आहेत. |
| १३ | केंद्र इतर ठिकाणी (इंद्रायणीनगर मो.जा.से.नं. २४ जॉगींग ट्रॅक) वेणुनगर, कृष्णानगर, नवी सांगवी सुधारे उद्यान इ.) | १२.३२ | ६०८३ | |

## *वृक्षारोपणाची ठळक वैशिष्ट्ये -*

१) **गायरानामधील व मोकळ्या जागांमधील वृक्षारोपण -**

**गेल्या सात वर्षापासुन म.न.पा.ने मोकळ्या जागा तसेच नुकत्याच म.न.पा. हद्दीत समाविष्ट झालेल्या नवीन गावातील गायरानांमध्ये वृक्षारोपण मोहीम हाती घेवून ती पुर्ण केली व त्यामुळे जागा अतिक्रमण होण्यापासून वाचविलेल्या आहेत. सदरच्या जागेमध्ये ४ ते ६ फुट उंचीची दिर्घायुषी झाडे लावणेत आलेली आहेत.**

२) **वृक्षारोपण रोपांचे सवलतीचे दराने / मोफत वाटप -**

म.न.पा.च्या सन १९८२ पासून सवलतीचे दराने / मोफत शहरातील नागरीक व संस्थांना ८ लाखापेक्षा जास्त रोपांचे वाटप केले असून त्यामुळे शहरातील नागरीक, सहकारी गृहसंस्था, कारखानदार, खाजगी शाळा, प्रशासकीय, निमशासकीय संस्था यांनी स्वयंस्फुर्तीने वृक्षारोपण मोहीमेत सहभाग घेतला व परीसर हीरवागार होण्यास मदत झाली. त्यामुळे सध्या शहरात मानांकापेक्षा जास्त झाडे दिसून आली आहेत.

३) **म.न.पा. च्या विकसित उद्यानामध्ये**

२५% क्षेत्रावर दिर्घायुषी झाडे लावणेची अंमलबजावणी करणेत आली आहे.

# *-: उद्याने : -*

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने नागरिकांच्या, बालगोपाळांच्या मनोरंजनासाठी शहराचे सौंदर्य वाढावे व पर्यावरण संतुलन रहावे, या उद्देशाने शहरामध्ये ठिकठिकाणी १११४९ एकर क्षेत्रावर १३० उद्याने विकसित केलेली असून ८४.७४ एकर क्षेत्रावर ५१ उद्याने विकसित करणेचे कामकाज चालू आहे. विकसीत केलेल्या उद्यानामध्ये खालील वैशिष्टये पुर्ण उद्यानांचा समावेश आहे.

१) यशवंतराव चव्हाण गुलाब पुष्प उद्यान, नेहरुनगर

२) दुर्गादेवी उद्यान, निगडी

३) अप्पुघर उद्यान, निगडी

४) श्री. साई उद्यान, जी ब्लॉक

५) फुलपाखरू उद्यान, जी ब्लॉक

६) राजर्षी शाहू उद्यान, शाहुनगर

७) सावरकर उद्यान, प्रेमलोक पार्क

८) आयुर्वेदीक वनऔषधी उद्यान एफ टु ब्लॉक

९) पर्यावरण संस्कार उद्यान, भोसरी

१०) पिंपळे निलख उद्यान

११) भक्ती शक्ती उद्यान, निगडी

१२) नाना - नानी पार्क, यमुनानगर

या उद्यानांचा आकर्षकपणा वाढावा व बाळगोपाळांचे मनोरंजन व्हावे, या उद्देशाने महापालिकेने यशवंतराव चव्हाण गुलाब पुष्प उद्यान, प्रेमलोक पार्क उद्यान व भोसरी तळे या ठिकाणी प्रत्येकी एक झुकझ्ुकगाडी (मिनीट्रेन) बसविणेत आलेली आहे.

## ■ *ठळक वैशिष्टये :-*

१) **रोपवाटीका -**

उद्याने वृक्षारोपणाचे रोपे तयार करणेचे काम रोपवाटीकांमध्ये चालते. सर्व प्रभागात रोपवाटीका केंद्रे आहेत.

२) **मध्यवर्ती रोपवाटीका व फळझाडे संग्रहालय चिखली -**

चिखली स.न. १६५३ / १६५४ येथे ३.४० हेक्टर क्षेत्रावर मध्यवर्ती रोपवाटीका व फळझाडे संग्रहालय करणेत आले असुन या ठीकाणी विविध ५७ प्रकारची १०२९ फळझाडे लागवड करणेत आलेली आहेत. याचा उपयोग परीसरातील शालेय विद्यार्थ्यांना व शिक्षकांना निश्चितच होणार आहे. तसेच या ठिकाणी ६" X ९" च्या पिशव्यांमध्ये ५०,००० ते १०" X १६" च्या पिशव्यांमध्ये ५०,००० अशी एकूण

वृक्षारोपणाची १,००,००० रोपे तयार करणे आलेली आहेत. सदर रोपवाटीकेचा व जागेचा महानगरपालिकेस भविष्यात निश्चितच फायदा होणार आहे.

३) **उद्यान महोत्सव -**

गतवर्षापासून माहे जानेवारी - फेब्रुवारी मध्ये उद्यान महोत्सव साजरा केला जातो. यामध्ये प्रभागावार उद्याने निवडून ती विविध हंगामी फुलझाडांनी सुशोभित करून नागरिकांसाठी खुली केली जातात. तसेच उद्यानांची प्रभागवार स्पर्धा घेवून उद्याने अधिक सुशोभित केली जातात.

४) **फुले, बागा, वृक्षारोपण स्पर्धा व प्रदर्शन -**

म.न.पा. मार्फत परीसरातील नागरिकांना विविध फुलांची, रोपांची आवड निर्माण व्हावी तसेच नागरीकांस, कारखानदारास, विद्यालये यांना प्रोत्साहित करणे व उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्थांचे कौतुक व्हावे. यासाठी शहरात दरवर्षी फुले, बागा, वृक्षारोपण स्पर्धा आयोजित केल्या जातात. यामध्ये सर्वसाधारण २०० ते ३०० स्पर्धक भाग घेतात. तसेच प्रदर्शनाचे दोन दीवसांचे कालावधीमध्ये २० ते २५ हजार नागरीक प्रदर्शनास भेट देतात.

## -: पिंपरी - चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील उद्यानांची माहिती :-

महानगरपालिका क्षेत्रातील उद्यानांपैकी विकसित उद्याने, विकसनशील उद्याने, आरक्षित उद्याने असे प्रकार पडतात. "अ" प्रभागात ६४.२९ हेक्टर क्षेत्रात ५७ विकसित उद्याने, १५ विकसनशील उद्याने, ३६.१८ हेक्टर क्षेत्रात आहेत. "ब" प्रभागात ३८ विकसित उद्याने (१४.१२ हेक्टर), १२ विकसनशील उद्याने (९.५५ हेक्टर) आहेत. "क" प्रभागात १४ विकसित उद्याने (१९.२१ हेक्टर) १२ विकसनशील उद्याने (२४.६० हेक्टर) आहेत. त्याचप्रमाणे "ड" प्रभागात २२ विकसित उद्याने (१३.८७ हेक्टर), १२ विकसनशील उद्याने (१४.४१ हेक्टर), एकंदरित १३१ विकसित उद्याने (१११.४९ हेक्टर), ५१ विकसनशील उद्याने (८४.७४ हेक्टर) आहेत.

आरक्षित उद्यानांचे आरक्षण अद्यापपर्यंत निश्चित झालेले नाही त्यामुळे त्यांची माहिती देण्यात आलेली नाही.

# नागरी वनीकरण बृहत आराखडा अंमलबजावणी
## सन २००५ - २००६ ते सन २००७ - २००८

**सन २००५ - २००६**

| अक | ठिकाण | उद्दिष्ट | झालेले वृक्षारोपण | जिवंत वृक्षारोपण |
|---|---|---|---|---|
| १ | अ प्रभाग | ७२०८ | ७६८१ | ५३४२ |
| २ | ब प्रभाग | १७७२ | ४४९८ | ३५९८ |
| ३ | क प्रभाग | ४३९० | २४४० | २०६५ |
| ४ | ड प्रभाग | ६९६२ | ८६५९ | ६८१२ |
| ५ | दुर्गादेवी उद्यान | - | ३०० | |
| ६ | दिघी ते आळंदी पालखी मार्गे (मिलिटरी हद्दी मार्गे) * | १०००० | ८२५६ | ६९०७ |
| | **एकुण** | ३०३३२ | ३१५३१ | २५३२४ (७९.५३%) |
| | **रोपवाटिकेतून विक्री व वाटप १९६६८** | | २००३० | - |

**सन २००६ - २००७**

| अक्र | ठिकाण | उद्दिष्ट | झालेले वृक्षारोपण | जिवंत वृक्षारोपण |
|---|---|---|---|---|
| १ | अ प्रभाग | ४९२० | ५०१७ | ३७३५ |
| २ | ब प्रभाग | २२२५ | २३९३ | २१५९ |
| ३ | क प्रभाग | ३७२५ | ५०७७ | ४१२३ |
| ४ | ड प्रभाग | १७३५ | १४५२ | १२१५ |
| ५ | दुर्गादेवी उद्यान | १०००० | १२२५७ | ९४३७ |
| ६ | दिघी तेआळंदी पालखी मार्गे (मिलिटरी हद्दी मार्गे) * | ७०००० | ८९०९ | २०५५ |
| | **एकुण** | ९२६०५ | ३५१०५ | २२७२८ (६४.७३%) |
| | **रोपवाटिकेतून विक्री व वाटप ७३९५** | | ७०९९ | - |

**सन २००७ - २००८**

| अक | ठिकाण | उद्दिष्ट | झालेले वृक्षारोपण | जिवंत वृक्षारोपण |
|---|---|---|---|---|
| १ | अ प्रभाग | २८१० | ७८९८ | **जिवंत वृक्षांची गणना चालु आहे.** |
| २ | ब प्रभाग | ५९४० | ५५१६ | |
| ३ | क प्रभाग | २९५२ | ५६६७ | |
| ४ | ड प्रभाग | १७६० | ५३२४ | |
| ५ | दुर्गादेवी उद्यान | ३००० | ५२४३ | |
| ६ | मिलिटरी हद्द (औंध) * | २५००० | ११९८८ | |
| | **एकुण** | ४१४६२ | ४१६३६ | |
| | **रोपवाटिकेतून विक्री व वाटप** | ८५३८ | ७९२२ | -- |

* मिलीटरी हद्दीमधील रस्त्यांच्या कडेने मोकळ्या उपलब्ध जागेनुसार वृक्षारोपण करण्यात येते.

# महापालिका क्षेत्रातील विकसित व विकसनशील, आरक्षित उद्यानाचा

# (गोषवारा) मार्च - २००८ अखेर पर्यंत

| अ.क्र | प्रभाग | विकसित उद्याने | | विकसनशील उद्याने | |
|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | क्षेत्रफळ (हेक्टर) | संख्या | क्षेत्रफळ (हेक्टर) |
| १ | "अ"प्रभाग | ५७ | ६४.२९ | १५ | ३६.१८ |
| २ | "ब" प्रभाग | ३८ | १४.१७ | १२ | ९.५५ |
| ३ | "क"प्रभाग | १४ | १९.२१ | १२ | २४.६० |
| ४ | "ड" प्रभाग | २२ | १३.८७ | १२ | १४.४१ |
| | **एकुण** | **१३१** | **१११.५४** | **५१** | **८४.७४** |

# सन २००८-२००९ मध्ये विकसित करावयाची उद्याने

| अ.क्र. | उद्यानाचे नाव | क्षेत्र हेक्टर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | पेठ क्रमांक १८ मो जा क्र १७, १७ अ व १८ जॉगिंग ट्रॅंक | ०.३० | काम चालु आहे (स्थापत्य मार्फत) |
| २ | पेठ क्रमांक २० मो जा क्रमांक ९ कृष्णानगर पाण्याचे टाकीजवळ | १.४३ | टर्न कि तत्वावर स्थापत्य काम चालु |
| ३ | एम आय डी सी मो जा क्र ६० | २.८० | टर्न कि तत्वावर स्थापत्य |
| ४ | आ.क्र. ३०२ खाण | १०.३० | टर्न कि तत्वावर स्थापत्य काम चालु |
| ५ | साई शारदा आय टी आय | ०.१२ | उद्यान विभागामार्फत काम चालु |
| ६ | स.नं. ७२/२ आ.क्र. ३५२ पिंपळे गुरव भाग २ | १.६२ | टर्न कि तत्वावर स्थापत्य काम चालु |
| ७ | वाकड पर्यटन केंद्र भाग २ | १.०० | उद्यान विभागामार्फत (स्थापत्य कामे अपुर्ण) काम चालु |
| ८ | थेरगाव स्मशानभुमी | ०.२० | स्थापत्य मार्फत नुतनीकरणाचे काम चालु |
| ९ | निगडी उड्डान पुलाखालील सुशोभिकरण | ०.२० | उद्यान विभागामार्फत काम चालु |
| १० | क प्रभाग भोसरी स नं २१० आ य क्र ४०५ | १.४६ | स्थापत्य मार्फत काम चालु |
| ११ | कासारवाडी आ.क. २५ | १.३७ | स्थापत्य मार्फत काम चालु |
| १२ | दिघी सन ७७ | ०.८० | उद्यान विभागामार्फत काम चालु |
| १३ | से.नं. १६ मो जा क्र ३ | ०.७९ | -- |
| १४ | से नं २६ गणेश तलाव | ६.०० | निवीदा कार्यवाही |
| १५ | फुटबॉल मैदान संत तुकारामनगर | ०.७४ | उद्यान विभागामार्फत कामाचे नियोजन चालु |
| १६ | विरंगुळा केंद्र भाग २ | १.३० | उद्यान करणेबाबत बिल्डरचा प्रस्ताव |
| १७ | श्रध्दा गार्डन चिंचवड | ०.२५ | उद्यान विभागामार्फत कामाचे नियोजन चालु |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | पार्वती उद्यानजवळील मोकळी जागा | ०.४० | -- |
| १९ | आ.क्र. ९१ उर्वरित भाग | २.१२ | -- |
| २० | मो. जा ३ महाराष्ट्र कॉलनी से नं १ | ०.९९ | -- |
| २१ | इंद्रायणीनगर दक्षिणेकडील मो जा | ०.८८ | उद्यान विभागामार्फत कामाचे नियोजन चालु |
| २२ | सन २२४ मो. जा. गंगोत्रीपार्क | ०.२५ | स्थापत्य मार्फत कार्यवाही चालु |
| २३ | वेणुनगर मोकळी जागा | ०.३० | शहर अभियंता यांचेमार्फत आर्किटेक्ट नेमणुक |
| २४ | सांगवी स.न. | ०.४० | निविदा प्रक्रिया चालु |
| २५ | आ.क्र. ६५३ रहाटणी | १.५० | उदयान करणेबाबत बिल्डरचा प्रस्ताव काम चालु |
| २६ | श्रीराम मंदिर उदयान रहाटणी | ०.२५ | निविदा कार्यवाही पुर्ण |
| २७ | लोकमान्य हॉस्पीटल ते गणेशनगर डिव्हायडर सुशोभिकरण | ०.३१ | ..//.. चालु |
| २८ | के एस बी चौक ते नाशिक हायवे भोसरी | २.९९ | स्थापत्यमार्फत काम चालु |
| २९ | पुणे मुंबई हायवे दापोडी ते निगडी | ७.८९ | अंशत: कामे चालु उर्वरित निविदा कार्यवाही चालु |
| ३० | वाकड पोलिस चौकी बायपास सुशोभिकरण | २.०० | आर्किटेक्ट नेमणुक |
| ३१ | दापोडी दुभाजक | ०.२६ | ..//.. |
| ३२ | त्रिवेणीनगर दुभाजक | ०.२५ | ..//.. |
| ३३ | बालभवन खराळवाडी | ०.१६ | काम चालु |
| ३४ | कामगारनगर खराळवाडी | ०.२२ | ..//.. |
| | **एकुण क्षेत्र** | **५१.८५ हेक्टर** | |

# सन २००८-२००९ मध्ये नुतनीकरण करावयाची उदयाने

| अ.क्र. | उदयानाचे नाव | क्षेत्र हेक्टर | शेरा |
|---|---|---|---|
| १. | मुक्ताई उदयान | ०.७५ | उदयान विभागामार्फत काम चालु |
| २. | विठ्ठल मंदिर उदयान | ०.५७ | काम चालु |
| ३. | गजानन महाराज उदयान | ०.७९ | काम चालु |
| ४. | पार्वती उदयान/मोरया उदयान | ०.८० | काम चालु |
| ५. | संत कबीर बाग | ०.५४ | निविदा प्रक्रिया पुर्ण |
| ६. | चिखली मैलाशुध्दीरण केंद्र | ०.४५ | तांत्रिक मान्यता प्रक्रिया |
| ७. | सुभाष पांढरकर उदयान | ०.३० | . . . . . . |
| ८. | शंकर शेट्टी उदयान | २.१० | निविदा प्रक्रिया पुर्ण |
| ९. | सेंट ॲन्थोनी उदयान | ०.१६ | . . . . . |
| १०. | सोपान लोंढे उदयान | ०.६४ | निविदा प्रक्रिया चालु |
| ११. | कासारवाडी स्मशानभुमी | ०.१२ | . . . . . |
| १२. | पिंपरी वाघेरे घाट नं १ व २ | ०.७० | निविदा प्रक्रिया रस्ता बाधीत |
| १३. | श्रीधरनगर उदयान | ०.८० | आर्किटेक्ट नेमणे |
| १४. | पिंपळे निलख उदयान | १.०० | . . . . . |
| १५. | उदयोगनगर उदयान | ०.४० | . . . . . |
| | **एकुण क्षेत्र** | **१०.१२ हेक्टर** | |

# महापालिका क्षेत्रातील विकसित उदयाने

## अ प्रभाग

| अ.क्र. | वार्ड क्र | वार्डाचे नाव | अ.क्र. | विकसित उदयानाची नावे | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १. | १ | तळवडे गावठाण | १ | पॉलिहाऊस तळवडे | ०.२० |
| २. | ४ | कृष्णानगर | २ | रायरेश्वर मंदिर व कृष्णमंदिर से नं २० | ०.३० |
| | | | ३ | महात्मा फुले नगर उद्यान से नं १८ शॉपिंग सेंटर चिखली | ०.४४ |
| | | | ४ | मैला शुध्दीकरण केंद्र | ०.४५ |
| ३. | ६ | गणेशनगर | ५ | इंदिरा गांधी उदयान चिखली | ०.४५ |
| ४. | ३८ | संघवी केशरी कॉलनी | ६ | शाहु उद्यान शाहुनगर | २.३३ |
| | | | ७ | महात्मा फुले उदयान | ०.४३ |
| | | | ८ | थरमॅक्स रोड एच डी एफ सी कॉलनी के एस बी पंप | ०.५८ |
| | | | ९ | मोकळी जागा क्र. १० पुष्पवाटिका | २.०० |
| ५ | ४० | मोहननगर | १० | शंकरशेट्टी उदयान | २.१० |
| | | | ११ | श्रीम अनुसया बाबर उदयान | ०.१० |
| ६ | ४१ | काळभोरनगर | १२ | राजश्री शाहु तलाव उदयान | ०.०८ |
| ७ | ४२ | संभाजीनगर | १३ | साई उदयान | २.५१ |
| | | | १४ | सर्पोद्यान व पक्षालय | ३.४१ |
| | | | १५ | अम्ब्रेला पार्क | ०.१७ |
| | | | १६ | संभाजीनगर रस्ता सुशोभिकरण | ०.१४ |
| ८ | ४४ | यमुनानगर | १७ | अष्टविनायक मंदिर | ०.१० |
| | | | १८ | इंदुताई मरळ उद्यान | ०.१२ |
| | | | १९ | स्वामी समर्थ उद्यान | ०.११ |
| | | | २० | नाना नानी उद्यान | ०.२१ |
| | | | २१ | मिनाताई ठाकरे मैदान उद्यान | ०.२२ |
| | | | २२ | मुक्ताई उद्यान | ०.७५ |
| ९ | ४५ | दत्तमंदिर ओटास्किम | २३ | गुरुदत्त उद्यान | ०.१० |
| १०. | ४७ | निगडी जकातनाका | २४ | खाडे उद्यान | ०.१० |
| | | | २५ | निगडी स्मशानभुमी | ०.३९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | ४८ | निगडी गावठाण | २६ | सदगुरु दत्त उद्यान | ०.३७ |
| | | | २७ | महाराणा प्रताप पुतळा | ०.०६ |
| १२ | ४९ | भक्ती शक्ती | २८ | दुर्गादेवी टेकडी उद्यान | २४.०० |
| | | | २९ | भक्ती शक्ती उद्यान | ०.८० |
| | | | ३० | वाहतुक नगरी उद्यान | ०.५५ |
| | | | ३१ | अप्पुघर | ३.०३ |
| | | | ३२ | जलशुध्दीकरण केंद्र उद्यान | १.०० |
| | | | ३३ | से नं २३/२४ डिव्हायडर | ०.६९ |
| | | | ३४ | विठ्ठल मंदिर उद्यान | ०.५७ |
| | | | ३५ | मारुती मंदिर उद्यान | ०.५९ |
| | | | ३६ | शंकर मंदिर उद्यान | ०.४१ |
| | | | ३७ | राधाकृष्ण उद्यान | ०.४१ |
| | | | ३८ | हनुमान मंदिर उद्यान | ०.७१ |
| | | | ३९ | माऊली मंदिर उद्यान | ०.४१ |
| | | | ४० | रामबाग उद्यान | ०.५२ |
| | | | ४१ | से नं २३/२६ दुभाजक | ०.१२ |
| | | | ४२ | स्पाईन रोड | ०.८५ |
| १३ | ५० | संत तुकाराम महाराज उद्यान | ४३ | गणेश बाग | ०.३० |
| | | | ४४ | दादा दादी उद्यान | ०.७० |
| | | | ४५ | अण्णाभाऊ साठे उद्यान व बजाज ॲटो कारंजे | ०.३० |
| | | | ४६ | माता अमृतानंदमयी बाल उद्यान | ०.१३ |
| | | | ४७ | संत तुकाराम उद्यान | ०.८९ |
| १४ | ५१ | दत्तवाडी | ४८ | संत कबीर उद्यान | ०.५८ |
| १५ | ५२ | तळाजाई वस्ती | ४९ | कला दालन उद्यान | ०.२७ |
| १६ | ५३ | आकुर्डी गावठाण | ५० | पांढरकर उद्यान आ ३ २७४ | ०.३६ |
| १७ | ५४ | गंगानगर | ५१ | गंगाई उद्यान | ०.२८ |
| | | | ५२ | विजय कॉलनी मो जा १/२/३ | ०.२० |
| १८ | ५५ | पि चि पॉलिटेक्निक | ५३ | संत ज्ञानेश्वर उद्यान से नं २८ | ३.६७ |
| | | | ५४ | से नं २७ नर्सरी | २.३० |
| | | | ५५ | गजानन महाराज उद्यान | ०.७३ |
| | | | ५६ | स्वामी समर्थ उद्यान | ०.३३ |
| | | | ५७ | से नं २६/२७ दुभाजक | ०.५० |
| | | | | **एकुण उद्याने ५७** | **६४.४२** |

# महापालिका क्षेत्रातील विकसित उद्याने

## ब प्रभाग

| अ.क्र | वार्ड क्र | वार्डाचे नाव | अ.क्र. | विकसित उद्यानांची नावे | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १. | २९ | मासुळकर कॉलनी | १ | मा आयुक्त बंगला उद्यान | ०.१७ |
| | | | २ | मो जा क्र १५ आयुर्वेदिक वनौषधी उद्यान | ०.६५ |
| | | | ३ | कै इंदिरा गांधी उद्यान | ०.२५ |
| २. | ३१ | वाय सी एम हॉस्पीटल | ४ | संत शिरोमणी सावतामाळी उद्यान | ०.२२ |
| | | | ५ | यशवंतराव चव्हाण हॉस्पिटल उद्यान | ०.७४ |
| | | | ६ | महेशनगर उद्यान | ०.१७ |
| ३ | ३२ | संत तुकाराम नगर | ७ | बी डी किल्लेदार उद्यान | ०.६४ |
| | | | ८ | सेंट ॲन्थोनी उद्यान | ०.१६ |
| | | | ९ | मारुती मंदिर उद्यान | ०.०७ |
| | | | १० | पु. ल. देशपांडे उद्यान | ०.२७ |
| | | | ११ | आ क्र ५५ विरंगुळा केंद्र भाग १ | ०.४१ |
| | | | १२ | मुंबई पुणे हमरस्ता दुभाजक सुशोभिकरण | |
| | | | १३ | बजाज ॲटो कॉलनी जवळी उद्यान | ०.१० |
| ४ | ३३ | खराळवाडी | १४ | आ क्र १०५ खाण उद्यान | ०.६२ |
| ५ | ३४ | नगर | १५ | आंबेडकर उद्यान उद्यान | ०.२० |
| | | | १६ | गोविंद शेट्टी उद्यान स न ४७०५ | ०.०५ |
| | | | १७ | महात्मा फुले पुतळा उद्यान | ०.१८ |
| | | | १८ | खराळवाडी ते अहिल्याबाई होळकर पुतळा चौक ग्रेडसेप्रेटर | ०.२३ |
| | | | १९ | अ.क्र. ९१ मोरवाडी भाग क्र. १ | १.४० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | ३५ | मोरवाडी | २० | कापसे उद्यान मोरवाडी | ०.३७ |
| ७ | ३६ | आनंतनगर | २१ | पुणे मुंबई रस्ता ते लोकमान्य हॉस्पिटल पर्यंत डिव्हायडर | ०.०४ |
| ८ | ६० | चिंचवड नगर | २२ | स न १५६ राजश्री शाहु उद्यान | ०.७५ |
| ९ | ६१ | पवनानगर | २३ | पवनानगर उद्यान | ०.३० |
| १० | ६२ | दळवीनगर | २४ | सावरकर उद्यान आ क्र १९८ प्रेमलोक पार्क | ०.७० |
| | | | २५ | रघुमाऊली उद्यान सन १५ | ०.६० |
| | | | २७ | चाफेकर स्मारक उद्यान | ०.४८ |
| | | | २८ | खैरे हॉस्पिटल जवळील मो जा स न १७१ | ०.१२ |
| ११ | ६३ | उद्योगनगर | २६ | सन १९५ उद्यान उद्योनगर | ०.४० |
| १२ | ६४ | चिंचवड गावठाण | २९ | पार्वती उद्यान चिंचवड | ०.५० |
| | | | ३० | मोरया उद्यान चिंचवड | ०.४३ |
| १३ | ६५ | केशवनगर | ३१ | कै वस्ताद बाळासाहेब विठोबा गावडे जलतरण उद्यान | ०.५५ |
| १४ | ६६ | दर्शन हॉल | ३२ | सावित्रीबाई फुले उद्यान स न २८२ | ०.१३ |
| | | | ३३ | स न २७६ गणेशपार्क | ०.१० |
| | | | ३४ | आंबेडकर चौक डिव्हायडर | ०.०३ |
| | | | ३५ | गावडे व्यायाम शाळा उद्यान | ०.०७ |
| १५ | ६७ | कै रामचंद्र मारे प्रेक्षागृह | ३६ | श्रीधरनगर उद्यान | ०.८० |
| | | | ३७ | गोलांडे उद्यान स न २६९ | ०.६० |
| | | | ३८ | चिंचवड प्रेक्षागृह उद्यान | ०.०४ |
| | | | | **एकुण उद्याने ३८** | **१३.५४** |

## महापालिका क्षेत्रातील विकसित उद्यानाची माहिती
## क प्रभाग

| अ क्र | वॉर्ड क्र. | वॉर्डाचे नाव | अ.क | उद्यानाचे नाव | क्षेत्रफळ हेक्टर/ आर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २१ | धावडेवस्ती | १ | भोसरी सहल केंद्र स.न. १ | ५.८० |
| २ | २२ | लांडेवाडी | २ | आ.क्र.४२५ स.न. ६९५ सोपान लोंढे उद्यान | ०.६८ |
| ३ | २४ | इंद्रायणीनगर | ३ | कै. रामकृष्ण मोरे उद्यान | ०.५४ |
| | | | ४ | वॉटर पार्क | ०.७९ |
| | | | ५ | पेठ क्र. २ पाण्याच्या टाकीजवळील मो.जा.नाना नानी पार्क | ०.५४ |
| ४ | २६ | महात्मा फुले नगर | ६ | आण्णाभाऊ साठे उद्यान लांडेवाडी | ०.३९ |
| | | | ७ | पर्यावरण संस्कार उद्यान | ५.४२ |
| ५ | २७ | आण्णाभाऊ मगर स्टेडिअम | ८ | यशवंतराव चव्हाण गुलाबपुष्प उद्यान | ४.०० |
| | | | ९ | आण्णासाहेब मगर स्टेडिअम | ०.४० |
| | | | १० | जलतरण तलाव | ०.१० |
| | | | ११ | पाण्याची टाकी मोजा. नेहरुनगर | ०.०७ |
| ६ | ९९ | शंकरवाडी | १२ | कै. मामासाहेब पिंपळे उद्यान | ०.१७ |
| ७ | १०० | कासारवाडी | १३ | कासारवाडी स्मशानभुमी | ०.१२ |
| ८ | १०१ | फुगेवाडी | १४ | आत्माराम आगरवाल व चड्डा उद्यान कुंदनगर | ०.१९ |
| | | **एकुण** | | **उद्याने १४** | **१९.२१** |

## महापालिका क्षेत्रातील विकसित उद्यानाची माहिती

### ड प्रभाग

| अ.क्र | वार्ड क्र | वार्डाचे नाव | अ.क्र. | विकसित उद्यानाची नावे | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १. | ७० | जिजामाता हॉस्पीटल | १ | साधु वासवानी उद्यान | ०.४० |
| | | | २ | जिजामाता रुग्णालय | ०.०५ |
| | | | ३ | पिंपरी नगर स्मशानभुमी | ०.३० |
| २ | ७१ | माता वैष्णवदेवी मंदिर | ४ | डी वार्ड उद्यान | ०.१० |
| ३ | ७२ | अशोक थिएटर | ५ | शास्त्री पार्क उद्यान | ०.२० |
| | | | ६ | हेमुकलानी उद्यान | ०.४० |
| ४ | ७४ | भैरवनाथ मंदिर | ७ | पिंपरी घाट नं १ | ०.४० |
| | | | ८ | पिंपरी घाट नं २ | ०.३० |
| | | | ९ | स न १७५ जोगमहाराज उद्यान | १.२० |
| ५ | ८२ | थेरगाव गावटाण | १० | छत्रपती शिवाजी महाराज पुतळा | ०.०५ |
| | | | ११ | बापुजीबुवा उद्यान | ०.५५ |
| ६ | ८५ | पद्मजी पेपर मिल | १२ | थेरगाव बोट क्लब उद्यान | २.०० |
| | | | १३ | छ शिवाजी महाराज पुतळा डांगे चौक | ०.३० |
| | ८६ | गणेशनगर | १४ | स न १५ आ क्र ६३५ गुजरनगर | १.७० |
| ७ | ८७ | वाकड गावठाण | १५ | वाकड पर्यटन कैद्र | १.८१ |
| ८ | ९० | पिंपळे निलख | १६ | पिंपळे निलख उद्यान | १.०० |
| ९ | | | १७ | पिंपळे निलख कारंजे | ०.०५ |
| | ९२ | सांगवी गावठाण | १८ | वेताळ महाराज उद्यान | ०.३२ |
| १० | | | १९ | संत गोरोबा कुंभार उद्यान | ०.२८ |
| | ९४ | किर्तीनगर | २० | संत सावतामाळी उद्यान | ०.४५ |
| ११ | ९७ | पिंपळे गूरव गावठाण | २१ | महादेव मंदिर उद्यान व स्मशानभुमी | ०.२० |
| १२ | ९८ | सुदर्शननगर | २२ | स न ७२/२ आ क्र ३ पिंपळे गुरव शाळेजवळ | १.७३ |
| | | | | **एकुण उद्याने २२** | **१३.८९** |

## महापालिका क्षेत्रातील विकसनशील उद्याने

### अ प्रभाग

| अ.क्र | वार्ड क्र | वार्डाचे नाव | अ.क्र | विकसित उद्यानांची नावे | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १. | ४ | कृष्णानगर | १ | कृष्णानगर पाण्याची टाकी जवळील मो जा क्र ९ पेठ क्र २० | १.४३ |
| | ६ | चिखली जाधववाडी | २ | पेठ क्र १६ मो जा क्र ३ जाधववाडी | ०.७९ |
| | | | ३ | शिवाजी पार्क मो जा क्र १७,१७ अ व पेठ क्र १८ | १.१५ |
| २ | ७ | चिखली गावटाण | ४ | गणेश मंदिर उद्यान पेठ क्र १९ मो जा. क्र .१ कोयनानगर | ०.१५ |
| ३ | ३७ | चिंचवड स्टेशन | ५ | दफनभुमी मोरवाडी लिंगायतसमाज चिंचवड खाणीलगत | ०.२२ |
| ४ | ३८ | संघवी केशरी | ६ | थरमॅक्स चौक के. के. एस. बी. चौक | १.०० |
| | | | ७ | रमाबाई आंबेडकर खाण | ९.८२ |
| ५ | ३९ | एच डी एफ सी कॉलनी | ८ | आ क्र ३०२ संभाजीनगर खाण | १०.३० |
| | | | ९ | मो जा क्र ६० संभाजीनगर खाण | २.८० |
| ६ | ४४ | यमुनानगर | १० | विश्वकर्मा उद्यान | ०.१५ |
| | | | ११ | मो. जा. क्र .४ पेठ क्र २१ | ०.२३ |
| ७ | ४५ | दत्तमंदिर ओटास्किम | १२ | एच क्लस्टर | ०.१० |
| ८ | ५२ | तळजाई वस्ती | १३ | निगडी उड्डाणपुलाखाली | ०.१० |
| ९ | ५३ | आकुर्डी गावठाण | १४ | सुभाष पांढरकर उद्यान स न १७३ | ०.३० |
| १० | ५५ | पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक कॉलेज | १५ | गणेश तलाव परिसरातील उद्यान | ७.६४ |
| | | | | **एकुण उद्याने १५** | **३६.१८** |

# महापालिका क्षेत्रातील विकसिनशिल उद्याने

## ब प्रभाग

| अ.क्र. | वार्ड क्र. | वार्डाचे नाव | अ.क्र. | विकसित उद्यानांची नावे | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३१ | वाय.सी.एम. हॉस्पिटल | १ | अक्षय सोसा. मोकळी जागा | ०.११ |
| | | | २ | फुटबॉल मैदान संत तुकाराम नगर | ०.७४ |
| २ | ३२ | संत तुकाराम नगर | ३ | आ.क्र. ५५ विरंगुळा केंद्र संत तुकाराम नगर भाग २ | ०.४५ |
| | | | ४ | मुंबई पुणे हमरस्ता दुभाजक सुशोभिकरण, निगडी ते दापोडी | ३.५७ |
| ३ | ३५ | मोरवाडी | ५ | आ.क्र. ९१ मोरवाडी उद्यान | २.०० |
| ४ | ६२ | दळवीनगर | ६ | प्रेंमलोक नाला पार्क | १.३८ |
| ५ | ६४ | चिंचवड गावठाण | ७ | मोरया हॉस्पिटल समोरिल डिव्हायडर | ०.०३ |
| | | चिंचवड गावठाण | ८ | चिंचवड सि.स.नं. १८११ व १८१२ पवनानदीकाठी पार्वती व मोरया उद्यानालगत आ.क्र. २२५ पैकी | ०.७० |
| | | | ९ | चाफेकर पुतळा चौक | ०.०२ |
| ६ | ६५ | केशवनगर | १० | स.नं. २८५ उद्यान पवनानदीकाठी | ०.१० |
| | | | ११ | काकडे पार्कमधील मोकळी जागा | ०.२० |
| ७ | ६७ | कै. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह | १२ | सि.टी.स.नं. ४१३१ मो जा श्रध्दा गार्डन गावडे कॉलनी चिंचवड | ०.२५ |
| | | | | **एकुण उद्याने १२** | **९.५५** |

## महापालिका क्षेत्रातील विकसनशिल उद्याने

### क प्रभाग

| अ.क्र. | वार्ड क्र. | वार्डाचे नाव | अ.क्र. | विकसित उद्यानाची नावे | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| | ९ | बो-हाडेवाडी | १ | संजीवन कॉलनी | ०.११ |
| | | बो-हाडेवाडी | २ | गुरुविहार | ०.२२ |
| | | बो-हाडेवाडी | ३ | आ क्र २९ एम आय डी सी भोसरी (बालनगरी) | १५.० |
| १ | ११ | वडमुखवाडी | ४ | दिघी स न ७७ पैकी | ०.८० |
| २ | १३ | दिघी गावठाण | ५ | दिघी स्मशानभुमी | ०.१५ |
| ३ | १७ | सँडविक कॉलनी | ६ | स न २२४ मो जा क्र १ गंगोत्री पार्क | ०.२५ |
| ४ | १८ | गवळीनगर | ७ | आ क्र ४०५ आळंदी रोड | १.४६ |
| ५ | २१ | धावडे वस्ती | ८ | इंद्रायणीनगर पेठ क्र १ दक्षिणेकडील बाजु | ०.८८ |
| | | | ९ | एस टी पी पांजरपोळ | १.२५ |
| ६ | २५ | बालाजीनगर | १० | के एस बी चौक ते नाशिक हायवे पर्यंत रस्ता | २.९९ |
| ७ | ९९ | शकरवाडी | ११ | साईशारदा आय टी आय | ०.१२ |
| ८ | १०० | कासारवाडी | १२ | आ क्र २५ स न ४९६ कासारवाडी | १.३७ |
| | | | | एकुण उद्याने १२ | २४.६० |

## महापालिका क्षेत्रातील विकसिनशिल उद्याने

### ड प्रभाग

| अ.क्र. | वार्ड क्र. | वार्डाचे नाव | अ.क्र. | विकसित उद्यानांची नावे | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| | ७४ | भैरवनाथ मंदिर पिंपरी वाघेरे | १ | आ.क्र. १६६ सि स नं १४४/५ ते १० | १.४० |
| | ७५ | पिंपळे सौदागर | २ | आ.क्र. ३७१ ब | २.०० |
| १ | ७६ | रहाटणी गावठाण | ३ | राममंदिर, शंकरमंदिर मोकळी जागा | ०.२५ |
| | | | ४ | आ.क्र. ६५३ रहाटणी | १.५० |
| | ८१ | विजयनगर काळेवाडी | ५ | आ.क्र. ६३९ सिं स नं ५७८७/५८९० पै | २.७७ |
| २ | ८२ | थेरगाव गावठाण | ६ | थेरगाव स्मशानभुमी | ०.२० |
| ३ | ८५ | पद्मजी पेपर मिल | ७ | चिंचवड पुल ते डांगे चौक सुशोभिकरण | ०.४० |
| ८ | ८८ | वेणुनगर वाकड | ८ | वेणुनगर मो. जा. | ०.३० |
| | ८९ | पिंपळे निलख विशालनगर | ९ | पिंपळे निलख स नं २७ आ क्र ३८७ | ३.५० |
| ९ | ९० | पिंपळे निलख | १० | पिंपळे निलख स्मशानभुमी | ०.०७ |
| १० | ९२ | सांगवी गावठाण | ११ | सांगवी स नं ६ | ०.४० |
| ११ | ९८ | सुदर्शननगर | १२ | स नं ७२/२ आ क्र ३ पिंपळे गुरव शाळेजवळ भाग २ | १.६२ |
| | | | | **एकुण उद्याने १२** | **१४.४१** |

## -: मनपाने विकसित केलेली प्रभागवार ठळक उद्याने :-

### *'अ' प्रभागातील उद्याने :-*

१) **दुर्गादेवी उद्यान (मिनी महाबळेश्वर) -**

दुर्गादेवी उद्यान किंवा मिनी महाबळेश्वर हे महानगरपालिका क्षेत्रातील सर्वात मोठे उद्यान असुन ते 'अ' प्रभागात येते. क्षेत्र ७५ एकर असुन तीन एकर लॉन्स आहेत व त्याची समुद्र सपाटीपासुनची उंची २००० फुट आहे. प्रकल्पाची पायथ्यापासून उंची ८२ मीटर आहे. जगाच्या नकाशावर याचे ठीकाण ४० अक्षांश व ४४ रेखांश आहे. या ठिकाणी ५.३ कि.मी. प्रति ताशी वारा वाहतो. या ठिकाणी ६५ से.मी. पाऊस पडतो. या ठिकाणी वृक्षारोपणास १९७७ साली सुरूवात करून आज अखेर १,६०,००० पेक्षा जास्त झाडे आहेत. २ कि.मी. लांबीचा रस्ता असून तळ्याचे क्षेत्र ८१४० चौ.मि. असुन खोली २ ते ४ मिटर आहे. तळ्यामध्ये ४० फुट उंचीचे तरंगते कारंजे आहे. तसेच जवळच खडकावर ३० फुट उंचीचे कारंजे असुन तळ्यातील पाण्याचा उपयोग करून नैसर्गिक धबधबा तयार केलेला आहे. दुर्गादेवी उद्यानात एकुण १२ प्रकारचे पक्षी दिसुन येतात. उदा. खंड्या, पाकोळी, दयाल, ससाणा, निलकंठ इ. तसेच ७५०० चौ.मी. क्षेत्रावर (काही ठिकाणी) हिरवळ केलेली असुन नागरिक त्याचा उपभोग घेत आहेत. त्याच प्रमाणे लहान मुलांचे आकर्षणासाठी / मनोरंजनासाठी विविध प्रकारची खेळणी बसविणेत आलेली आहेत. या ठिकाणी १ मिनी रेल्वेचे नियोजन करण्यात येत आहे. दुर्गादेवी उद्यानास आज अखेर अनेक मान्यवरांनी भेटी दिलेल्या असून यामध्ये मा. श्री.आय.एच.लतीफ (तात्कालिन राज्यपाल), मा. श्री. शंतनुराव किर्लोस्कर (उद्योगपती), मा. श्री. डॉ. सलीम अली (पक्षी तज्ञ), मा. श्री. सुखटनकर (तत्कालिन मुख्य सचिव) आदींचा समावेश आहे.

२) **साई उद्यान -**

उद्यानाचे क्षेत्र ६ एकर असून महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाचे निवासी क्षेत्रात हे उद्यान सन १९९९ मध्ये मा. श्री. शरद पवार यांच्या हस्ते उद्‌घाटन करून नागरिकांसाठी खुले केलेले आहे. उद्यानामध्ये १०००० चौ.मी. क्षेत्रावर हिरवळ तयार केली असुन त्यामध्ये २६८ प्रकारची शोभिवंत फुलझाडे ( उदा. जास्वंद, तगर, हेमलिया, पेंटस, चाफा, बॉटलब्रश इ.) ८०६ झाडांची किनार पट्टी लहान मुलांसाठी विविध १२ प्रकारची खेळणी बसविली आहेत. तसेच फुल पाखरांना आकर्षित करणेसाठी १० गुंठे जागा आरक्षित केलेली असुन त्यामध्ये फुलपाखरे आकर्षित होतील अशी २६८ प्रकारची झाडे व झुडपे लावणेत आलेली आहेत. या ठिकाणी आतापर्यंत ५४ प्रकारची फुलपाखरे दीसुन आलेली आहे.

३) **निसर्ग कवी बहिनाबाई चौधरी प्राणी संग्रहालय -**

उद्यानाचे क्षेत्र ९.१० एकर असुन उद्यानामध्ये ४०० चौ.मी. हिरवळ व ४६३ वृक्षांची किनारपट्टी असुन विविध प्रकारची १६ खेळणी बसविलेली आहेत. उद्यानामध्ये १६ प्रकारचे ५७ सरपटणारे प्राणी (सर्प) विविध प्रकारचे मासे -५०, बिबळे वाघ -०४, माकडे - १० (तीन प्रकारचे), मगर - ३, शेखरु - १, तसेच १५ प्रकारचे ७६ पक्षी व पाच प्रकारचे १५ सस्तन प्राणी असुन संग्रहालयाचे वैशिष्ट्य म्हणजे बिबळ्यासाठी अत्याधुनिक पिंजरा तसेच माकडांना मुक्त विहारासाठी अर्धा एकर जागा राखुन ठेवलेली आहे. तसेच देशातील पहीले सर्प प्रजनन केंद्र विकसित करण्यात आले आहे.

४) **स्पाईन रोड -**

प्राधिकरण से.नं. २३ ते २८ मध्ये चार पदरी रस्त्याचे दुभाजकांमध्ये २ कि.मी. अंतरामध्ये ६ मी. रुंदीमध्ये सुशोभिकरण करणेत आले असुन त्यामध्ये ३२३० चौ.मी. हेजेस ( उदा. गोल्डन टुरांटा, लॅन्टाना, सुरु इ.) व विविध प्रकारची २८० फुलझाडे लावणेत आलेली आहेत. तसेच ठीकठीकाणी हीरवळ करणेत आलेली आहे. अशा प्रकारे अ प्रभागात ५७ उद्याने असुन त्याचे क्षेत्र ६४.२९ हेक्टर आहे. तसेच १५ उद्याने विकसित करावयाचे असुन त्याचे क्षेत्र ३६.१८ हेक्टर आहे.

## *'ब' प्रभागातील उद्याने :-*

१) **कापसे उद्यान मोरवाडी -**

एम.आय.डी.सी. एच ब्लॉक मधील मोकळ्या जागेवर १ एकर क्षेत्रावर उद्यान विकसित केले असुन उद्यानामध्ये १/२ एकर क्षेत्रावर हीरवळ ५३६ मी. लांबीची हेजेस, ४० फुलझाडे, १२० वृक्ष आदींचा समावेश आहे. उद्यानामध्ये बालगोपाळांसाठी विविध प्रकारची १२ खेळणी बसविणेत आलेली आहेत. उद्यानात सुरुची आकर्षक टॉपाअरी वर्क (विविध आकार करणेत आलेले आहे.)

२) **सावरकर उद्यान -**

चिंचवड मधील प्रेमलोक पार्कमधील परीसरात सोसायटीचे मोकळ्या जागेत आकर्षक उद्यान विकसित केले असुन क्षेत्र १.३० एकर आहे. त्यामध्ये ०.२५ एकर क्षेत्रावर हिरवळ ८०० मी. हेजेस, २०० फुलझाडे, ३०० वृक्ष, आदींचा समावेश आहे. उद्यानामध्ये ७ विविध प्रकारची खेळणी बसविण्यात आलेली आहे. उद्यानात वीहिर असुन त्याद्वारे पाणीपुरवठा होतो. उद्यानामध्ये लहान मुलांसाठी मिनी ट्रेन बसविणेत आली आहे.

३) **<u>श्रीधर नगर उद्यान -</u>**

चिंचवड मधील श्रीधर नगर निवासी भागात नगरपालिका असताना टेल्को कंपनीच्या सहाय्याने २ एकर क्षेत्रावर उद्यान विकसित केले असुन उद्यानामध्ये १/४ एकर क्षेत्रावर हिरवळ, १०० फुलगाडी, १०० वृक्ष आदींचा समावेश आहे. विविध १७ खेळणी बाळगोपाळांसाठी बसविणेत आलेली असुन एक आकर्षक कारंजेही आहे.

४) **<u>मोकळी जागा क्र. ६२ शाहुनगर -</u>**

शाहुनगर चिंचवड एम.आय.डी.सी चे निवासी जी ब्लॉक मध्ये ५.३३ एकर क्षेत्रावर टर्न की तत्वावर सदरचे उद्यान विकसित केले असून उद्यानाला आकर्षक आराखडा आहे. त्यामध्ये हिरवळ, फुलझ्ाडे, पादचारी मार्ग, कडेने वृक्ष पट्टा यामुळे हे उद्यान वैशिष्ट्य पुर्ण ठरले आहे. उद्यानामध्ये आकर्षक नैसर्गिक धबधबा बसविणेत आला आहे. अशा प्रकारे ब प्रभागात ३८ उद्याने असुन त्याचे क्षेत्र १४.१२ हेक्टर आहे. तसेच १२ उद्याने विकसित करावयाचे असुन त्याचे क्षेत्र ९.५५ हेक्टर आहे.

## *'क' प्रभागातील उद्याने :-*

१) **<u>यशवंतराव चव्हाण गुलाब पुष्प उद्यान -</u>**

एम.आय.डी.सी च्या कार्यक्षेत्रामध्ये १० एकर क्षेत्रावर टी ब्लॉक येथे उद्यान विकसित केले असुन विविध ६० जातीची १२०० गुलाबांची लागवड करणेत आली आहे. तसेच कडेने सुरण, सिल्वर, ओक, निलगीरी अशा १५०० झाडांची किनारपट्टी आहे. ३० हंगामी फुलझाडांचे वेड असुन २ रॉकरीज व एक धबधबा आहे.

उद्यानामध्ये २५ फुट उंचीचे लाकडी मचाल व १९ प्रकारची खेळणी आहेत. सदर उद्यान हे पिंपरी चिंचवड परीसरामध्ये नावाजलेले असुन १९९२ ते १९९६ या वर्षामध्ये पुणे परिसरातील उत्कृष्ठ उद्यान म्हणून प्रथम क्रमांकाचे पारीतोषिक सलग ४ वर्षे मिळालेले आहे. या ठिकाणी उद्यान विभागाचे मुख्य कार्यालय आहे.

२) **<u>आयुर्वेदीक वनौषधी उद्यान -</u>**

एम.आय.डी.सी. चे एफ - २ ब्लॉक मध्ये २ एकर क्षेत्रावर विविध ५८ प्रकारच्या ३६० औषधी वनस्पतींची लागवड या ठिकाणी करण्यात आली असुन जनसेवा दत्ताश्रम यांचेमार्फत सदर वनस्पतींची

ओळख करून दिली जाते तसेच संधिवात, पोलिओ, मधुमेह, रक्तदाब इ. आजारावर दर बुधवारी दुपारी ३ ते सायं. ७ या वेळेत आयुर्वेदीक उपचारही केले जातात. या ठिकाणी आयुर्वेद रोपे विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

३) **पर्यावरण संस्कार उद्यान -**

एम.आय.डी.सी. टी ब्लॉक मध्ये १३ एकर क्षेत्रावर वृक्षारोपणाच्या माध्यमातून भावी पिढ्यांना वनस्पतींची प्रत्यक्ष ओळख व्हावी व त्याचे महत्व कळावे या उद्देशाने पर्यावरण संस्कार उद्यान तयार केले आहे. त्यामध्ये आतापर्यंत १३० प्रजातींची २८६३ वृक्ष लागवड केली आहे. त्याचे भाग खालीलप्रमाणे पाडले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) विषुवृत्तीय निमहरीत अरण्ये | - | वड, पिंपळ, अंजन इ. |
| २) विषुवृत्तीय पानझडी अरण्ये | - | कदंब, काटेसावर, अर्जुर इ. |
| ३) विषुवृत्तीय गवताळ प्रदेश | - | कुंदा, मारवेल, खसगवत इ. |
| ४) औषधी वनस्पती | - | बेल, कुंता, कुडा, नारा इ. |

या ठिकाणी विद्यार्थ्यासाठी व अभ्यासकांसाठी प्रशिक्षण देण्याचा मानस आहे. अशा प्रकारे क प्रभागामध्ये १४ उद्याने विकसित केलेली असुन त्याचे क्षेत्र १९.३१ हेक्टर आहे. १२ उद्याने विकसित करावयाची असुन त्याचे क्षेत्र २४.६० हेक्टर आहे.

## *'ड' प्रभागातील उद्याने :-*

१) **वाकड पर्यटन केंद्र -**

ग्रामीण भागात या ठिकाणी मुळा नदीकाठी म्हातोबा या ग्रामदेवतेचे शेजारी ३ एकराचे क्षेत्रावर वाकड पर्यटन केंद्र विकसित केले असून ३७०० चौ.मी. क्षेत्रावर हिरवळ असुन ४०१ चौ.मी. हेजेस, १७० फुलझाडे, ४०५ वृक्ष व विविध प्रकारची खेळणी बसविणेत आलेली आहेत.

२) **पिंपळे निलख उद्यान -**

पिंपळे निलख येथे सर्व्हे नं. -६०/२ येथे २.५ एकर क्षेत्रावर उद्यान विकसित केले असुन त्यामध्ये ३२०० चौ.मी. हेजेस, ६६ प्रकारची फुलझाडे, १६८ वृक्ष व विविध प्रकारची खेळणी बसविणेत आलेली आहेत.

अशा प्रकारे ड प्रभागामध्ये २२ उद्याने विकसित केली असुन त्याचे क्षेत्र १३.८७ हेक्टर आहे. १२ उद्याने विकसित करणेचे काम चालु असुन त्याचे क्षेत्र १४.४१ आहे.

## *-: पॉली हाऊस प्रकल्पाची माहिती :-*

मनपा मार्फत परिसरातील नागरिकांना शेतकी प्रकल्प व शेतीच्या आधुनिक तंत्राची ओळख व्हावी मनपाला उत्पन्न मिळुन मनपाचे कार्यक्रमासाठी आवश्यक असणाऱ्या दैनंदिन फुलांची गरज पुर्ण व्हावी म्हणून मनपा मार्फत तळवडे येथे २० गुंठे क्षेत्रावर पॉली हाऊस प्रकल्पाची निर्मिती करणेत आली आहे. त्यात प्रामुख्याने जरबेरा फुलांची लागवड करणेत आली आहे. सदर प्रकल्पाद्वारे मनपा परिसरातील विविध शेतकरी, विद्यार्थी व अभ्यासगत यांनी माहिती घेतलेली आहे. त्याचबरोबर मनपाचे दैंनंदिन फुलांची गरज पुर्ण करुन आजअखेर मनपास एकुण रक्कम रुपये ८,१२,१३७/- चे उत्पन्न मिळालेले आहे. तसेच लाल व पिवळी मिरची याचेद्वारे रक्कम रुपये ७१,७४५/- उत्पन्न मिळालेले आहे.

## *कर्मचाऱ्यांची माहिती : -*

उद्यान विभागाचे कामकाजासाठी सन १९७६ मध्ये ३५ कर्मचारी होते सध्या विविध अभिनामाची ३२२ पदे कार्यरत आहेत. यांमध्ये खालीलप्रमाणे समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| वर्ग १ | - | १ पद |
| वर्ग २ | - | ३ पदे |
| वर्ग ३ | - | ५९ पदे |
| वर्ग ४ | - | २५९ पदे |
| **एकुण** | **-** | **३२२ पदे** |

## *उद्यानाची पारितोषिके :-*

उद्यान विकासाची कामे करीत असताना पुणे परीसरातील फुल -बागा वृक्षारोपण स्पर्धामध्ये भाग घेऊन हजारापेक्षा जास्त बक्षिसे मिळविली असून काही उल्लेखनिय बक्षिसे खालीलप्रमाणे आहेत.

१) यशवंतराव चव्हाण गुलाब पुष्प उद्यानास पुण्यातील सार्वजनिक मोठे उद्यान म्हणून १९९३ -९४, १९९४-९५, १९९५-९६, १९९६-९७ मध्ये सलग ४ वर्षे प्रथम क्रमांक मिळाला असून राजमोंगिया चषक मिळालेला आहे.

२) म.न.पा. रोपवाटिका स.नं. २७ यास पुण्यातील उत्कृष्ट रोपवाटीका म्हणून १९९५-९६ मध्ये प्रथम क्रमांकाचे बक्षिस व एस.डी.ए. चषक मिळालेला आहे.

३) सेंट ॲन्थोनी उद्यानास लहान गटातील पुणे परिसरातील उत्कृष्ट उद्यान म्हणुन १९९२,९३,९४ मध्ये सलग ३ वर्षे प्रथम क्रमांकाचे बक्षिस मिळालेले आहे.

४) एक्सप्रेस गार्डन येथे प्रदर्शनास मा. राहुलकुमार बजाज यांच्या हस्ते सत्कार झाला आहे.

५) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने उद्यान वृक्ष संवर्धन विभागाअंतर्गत केलेल्या कामाची महाराष्ट्र शासनाने दखल घेऊन सन - १९९० चा वनश्री पुरस्कार महापालिकेस देऊन गौरव केलेला आहे. व केंद्र शासनाचा सन - २००२ चा इंदिरा प्रियदर्शनी वृक्ष मित्र पुरस्कार महापालिकेस देऊन गौरव करणेत आलेला आहे.